गार्निअर ब्लॅक नॅचरल्स प्रस्तुत

# झी नाटयगौरव पुरस्कार २०१७: मनोरंजनाचं साम्राज्य!

ड्राफ्ट ५.०

लेखक: क्षितिज पटवर्धन | दिग्दर्शक: समीर विदवांस

-----------------------------------------------------------

**अनाऊन्समेंटः** राष्ट्रगीताच्या सन्मानार्थ सर्वांनी उभं रहावं!

राष्ट्रगीत संपन्न!

-------------------------------------------------------

पडदा उघडण्यापूर्वी अनाऊन्समेंटः

**वंदना गुप्तेः** नमस्कार, गार्निअर ब्लॅक नॅचरल्स प्रस्तुत झी नाटयगौरव पुरस्कार २०१७ या सोहळयाची सुरुवात करण्याआधी दोन मिनीटे उभं राहून दिवंगत रंगकर्मींना श्रध्दांजली वाहूयात. संगीतकार अरुण कानविंदे, अभिनेत्री अश्विनी एकबोटे, नाटयसमीक्षक वि भा देशपांडे या साम्राज्यावर आपला ठसा उमटवून निघून गेले, त्यांना आमची ही भावपूर्ण श्रध्दांजली.

धन्यवाद!

**पुष्कराजः** कुठल्याही नाटकाची सुरुवात तिसऱ्या घंटेनी होते. आजही ती तिसरी घंटा दिली जाणारे. नाटयगृहात उपस्थित असलेल्या सगळया नाटयनिर्मात्यांना विनंती की त्यांनी पुढे यावं आणि रंगदेवतेची पूजा करावी, त्यानंतर सीताराम मामा कुंभार तिसरी घंटा देतील. मराठी रंगभूमी ज्या निर्मात्यांच्या कर्तृत्वावर दिमाखात उभी आहे, त्यांना झी मराठी तर्फेही मानवंदना!

-------------------------------------------------------

रंगदेवतेची पूजा आणि तिसरी घंटाःसीताराम मामा कुंभार, निर्माते

---------------------------------------------------------

**अॅक्ट १ः** दुर्गा झाली गौरीः सोनिया परचुरेः बालरंगभूमी

---------------------------------------------------------

**अँकर लिंक१ः**

वंदना गुप्ते रंगमंचावर येतात.

**वंदना गुप्तेः** नमस्कार, गार्निअर ब्लॅक नॅचरल्स प्रस्तुत झी नाटयगौरव पुरस्कार २०१७,को पॉवर्ड बाय गुडनाईट अॅडवान्स अॅक्टीव्ह प्लस, इम्पीरिअल ब्लू आणि लक्स, स्पेशल पार्टनर स्टॉप अॅलर्जी! या सोहळयात आपलं मनापासून स्वागत आहे. मी या सोहळयाची निवेदक. म्हणजे थोडक्यात पुढचे तीन तास तुम्ही माझ्या तावडीत असणार आहात. हा सोहळा सुरु करण्यापूर्वी आम्हाला मोलाची साथ देणाऱ्या सगळया प्रायोजकांचे मनापासून आभार.

Presenting sponsor: Garnier black naturals

Co powered by sponsors: Goodnight Advance active plus, imperial blue, LUX

Special Partner: Stop allergy

Associate Sponsor: Macho, Danone yogurt, Everest kanda Lasun Masala, Lagu bandhu Motivale, Colgate Max Fresh, Trust Index by Axis my india and vasmol black hair oil

झालं बाबा एकदाचं! तर आज इथं मी एकटी नाहीये आणि, माझ्याबरोबर माझा मुलगाही येणार होता...

(ऐतिहासिक वेशात पुष्कराज समोर येतो.)

पुष्कराजः हाय आई!

वंदना गुप्तेः हा माझा मुलगा. वाटत नसला तरी वाटून घ्यायचा. नाटक आहे की नाही? काय रे बाबा? आत्ता तर बरा होतास ना? काय केलंयस हे?

पुष्कराजः आई मी थिएटरमध्ये एन्टर करतोय!

वंदना गुप्तेः कुठल्या?

पुष्कराजः तसं नाही, आम्ही इंटर कॉलेजियेटला एक वन अॅक्ट प्ले करतोय, सिक्स पॅक सिकंदर वेशीबाहेर थबकला नावाचा.

वंदना गुप्तेः अजून थोडं मोठं चाललं असतं रे! सिक्स पॅक सिकंदर वेशीबाहेर थबकला?

पुष्कराजः आता मराठी वन ॲक्ट प्ले चं नाव काय असणार? मी सिकंदर करतोय. अभिनय वगैरे सगळं होईल पण मला सिकंदर च्या रोल साठी सिक्स पॅक करायचेत. आजीला सांगितलं तर तिनं कपाळावर हात मारला. मला म्हणाली नाटकात चाललायस? आता तू काय माणसात रहात नाहीस.

वंदना गुप्तेः तिला सांग माणूस असणं म्हणजे काय असतं, हे समजून घ्यायचं असेल तर जे बघायचं ना त्याला नाटक असं म्हणतात. असो, तुझं नाटक कधी आहे?

पुष्कराजः दीड महिना आहे.

वंदना गुप्तेः बरं, आणि तुला शेवटचं नाटक बघून किती दिवस झाले?

पुष्कराजः आय थिंक मी तुझ्या मांडीवर झोपून गेलो होतो.

वंदना गुप्तेः फार अलिकडचं आहे म्हणजे. असो. हे बघ मी आठवडयाला नाटक पहातेच. तू पण माझ्याबरोबर येत जा. आयडिया!! तुझा प्रयोग होईपर्यंत आपण दर शनिवार रविवार एकेक नाटक पाहूया का? म्हणजे तुझी नाटकाबददलची समज वाढेल.

पुष्कराजः पण त्याने सिक्स पॅक्स नाही येणार. ॲक्टींगसाठी मला लो कार्ब्स आणि हाय प्रोटीन वर जायचंय.

वंदना गुप्तेः प्रोटीन घेऊन फक्त बेडक्या येतात रे, अभिनय नाही येत. मला एक सांग, तू नाटकात काम करणार म्हणजे तू नेमका कशाचा भाग होणार हे तुला कळायला नको का? दीडशे वर्षाहून जास्त काळ जी रंगभूमी आपलं अस्तित्व दिमाखात टिकवून आहे, तिच्या साम्राज्यात प्रवेश करणारेस तू.

पुष्कराजः हो का? पण लोक तर म्हणतात, थिएटर संपत चाललंय.

वंदना गुप्तेः हो पण जॉन स्टनबॅक म्हणाला होता, थिएटर इज द ओन्ली इन्स्टिटयूशन विच इज डायिंग फ्रॉम थाऊजंड इयर्स ॲण्ड हॅज नेवर सकम्बड! रंगभूमी म्हणजे जादू आहे जादू! नाटकाची स्क्रीप्ट, दिग्दर्शकाचा अभ्यास, नटांची तयारी, त्या तालमी, सेटचा रंग, मेकअपच्या आरशा शेजारचे लख्ख बल्ब्स, तो स्पिरीट गमचा वास, तिसरी घंटा आणि जग बदलणारा अनुभव! तुला नाटक शिकायचं असेल ना, तर पहिले बॅकस्टेज कर!

पुष्कराजः माझा जन्म अभिनयासाठी झालाय आई!

वंदना गुप्तेः पण त्यानी प्रेक्षकांचाच मृत्यू झाला तर काय घ्या? हे बघ, लेखक हा नाटकाचा पाया असतो आणि दिग्दर्शक भिंत! नट नटया त्याचा कळस असतात. पण नाटकाला वर्षानुवर्ष टिकवून टेवतात ते पडयामगचे कलाकार नाटकाचे खरे खांब असतात. मग ती प्रकाशयोजना असो, नेपथ्य असो, वेशभूषा असो किंवा संगीत.

म्हणूनच सर्वात आधी सन्मान करुया, या पडदयामागच्या कलाकारांचा.

पुष्कराजः गार्निअर ब्लॅक नॅचरल्स प्रस्तुत झी नाटयगौरव पुरस्कार २०१७,को पॉवर्ड बाय गुडनाईट ॲडवान्स ॲक्टीव्ह प्लस, इम्पीरिअल ब्लू आणि लक्स, स्पेशल पार्टनर स्टॉप ॲलर्जी! या सोहळयात प्रायोगिक नाटकांसाठीचे तांत्रिक विभागाचे पुरस्कार देऊयात.

------------------------------------------------------------

अवॉर्ड सेट १ः

सर्वोत्कृष्ट रंगभूषाः

सर्वोत्कृष्ट वेशभूषाः

सर्वोत्कृष्ट संगीतः

सर्वोत्कृष्ट नेपथ्यः

सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजनाः

------------------------------------------------------------

अँकर लिंक२ः

वंदना गुप्तेः चला पुरस्कार देऊन झालेले आहेत, आपण नाटकाला निघूयात, उशीर होतोय. आज संगीत नाटकाचा प्रयोग आहे.

पुष्कराजः सॉरी आज माझा प्लॅन आहे फिल्मचा आणि तो नाही झाला तर ऑनलाईन सिरीज बघीन एखादी. बट आत्ता नाटक नको!

वंदना गुप्तेः परवा अतुल पेठे एका भाषणात म्हणाला, सिनेमाच्या मोठया पडदयावर प्रत्येक गोष्ट मोठी दिसते, टेलिवीजन किंवा लॅपटॉपवर प्रत्येक गोष्ट छोटी दिसते. म्हणजे एक्सपांडेड आणि कॉम्प्रेस्ड. नाटक ही एकमेव गोष्ट अशी आहे, ज्यात माणसं जशी आहेत तशी दिसतात. तीही लाईव्ह.

पुष्कराजः ग्रेट. हू इज अतुल पेठे?

वंदना गुप्तेः चुकूनही नाटकात जायचंय म्हणून बाहेर सांगू नको. अन पुण्यात तर आजिबात विचारु नको. चल. आपण शिवाजी मंदीर ला जाऊ आज.

पुष्कराजः शिवाजी मंदीर, ऐकलंय मी. कुठे आहे हे?

वंदना गुप्तेः आपल्या बिल्डींगमधनं खाली उतरलं आणि पहिला लेफ्ट घेतला की समोर काय येतं?

पुष्कराजः मॅकडी!

वंदना गुप्तेः गाढवा शिवाजी मंदीर!

पुष्कराजः ओ!! अच्छा मॅकडी शेजारी शिवाजी मंदीर आहे?

वंदना गुप्तेः नाही शिवाजी मंदीर शेजारी मॅकडी आहे.

पुष्कराजः आय नो! कुठलं नाटक आहे तिथे?

वंदना गुप्तेः (हात जोडतात.) जे आपल्या घरात रोज चाललेलं असतं तेच. संगीत मानापमान! पाहूया आजच्या संध्याकाळचा पहिला नाटयप्रवेश. संगीत मानापमान. घेऊन येतायत राहुल देशपांडे आणि प्रियांका बर्वे!

-----------------------------------------------------

<u>ॲक्ट २:</u> संगीत मानापमानः राहुल देशपांडे, प्रियांका बर्वेः संगीत रंगभूमी

-----------------------------------------------------

<u>अँकर लिंक ३:</u>

दोघे निवेदक येतात.

वंदना गुप्तेः काय मग आवडला का नाही?

पुष्कराजः हो हो! थोडा स्पायसी होता पण बेस्ट!

वंदना गुप्तेः काय रे?

पुष्कराजः वडा!

वंदना गुप्तेः गाढवा! पहिल संगीत नाटक पाहीलस तू आज. त्याचा प्रयोग आवडला का विचारतेय!

पुष्कराजः ओ ते?! अमेझिंग होतं. हे लाईव्ह गातात असं पाच पाच गाणी?

वंदना गुप्तेः पाच? अरे बालगंधर्व वीस वीस गायचे आणि किती वन्समोअर घ्यायचे माहीतीये का? तेरा तेरा! मराठी रंगभूमीची सुरुवात झाली ती या संगीत नाटकांपासनंच. या नाटकांमधूनच लेखक दिग्दर्शक गायकनट संगीतकार असे एकसे एक शिलेदार तयार झाले! मराठी माणसांचा झेंडा अटकेपार दुसऱ्यांदा फडकला, तो मराठी नाटकांमुळे! तुला सांगते १९१० साली कराचीला,

पुष्कराजः आपण एक रुल करुयात का? जे जे विकीपीडीयावर आहे ते तू मला सांगणार नाहीस. तूच म्हणाली होतीस ना इन्फॉर्मेशन प्रत्येकाकडे आहे, इनसाईट नाहीये.

वंदना गुप्तेः हो रे राजा. पण मराठी माणसाला नाटक आणि इतिहास म्हणलं की रमायला होतंच!

पुष्कराजः चला वळूया पुढच्या पुरस्कारांकडे, गार्निअर ब्लॅक नॅचरल्स प्रस्तुत झी नाटयगौरव पुरस्कार २०१७,को पॉवर्ड बाय गुडनाईट ॲडवान्स ॲक्टीव्ह प्लस, इम्पीरिअल ब्लू आणि लक्स, स्पेशल पार्टनर स्टॉप ॲलर्जी! या सोहळयातील व्यावसायिक नाटकांच्या तांत्रिक विभागातील पुरस्कार आता देऊयात!

आई पण त्या आधी मला सांग, उदया म्हणजे रविवारी कुठे जायचं नाटक बघायला?

वंदना गुप्तेः आधी पुरस्कार देऊया? मग घेऊनच जाते!

-----------------------------------------------------------------

<u>अवॉर्ड सेट २ः व्यावसायिक नाटक</u>

सर्वोत्कृष्ट रंगभूषाः

सर्वोत्कृष्ट वेशभूषाः

सर्वोत्कृष्ट संगीतः

सर्वोत्कृष्ट नेपथ्यः

सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजनाः

-----------------------------------------------------------------

<u>एका कोपऱ्यात छबिलदास असा बोर्ड दिसतो. दुसरीकडे अविष्कार.</u>

<u>अँकर लिंक ४ः</u>

पुष्कराजः मला इथं का आणलंय? आणि हे छबिलदास काय आहे?

वंदना गुप्तेः व्यावसायिक नाटकाचं मंदीर पाहीलंस ना, आता प्रायोगिक नाटकाचं पाहा. छबिलदास म्हणजे मराठी प्रायोगिक नाटकाची पंढरी!

पुष्कराजः ओ, प्रायोगिक! करेक्ट. आमच्याकडे नाटक बसवायला एक जण आलेत ते म्हणाले नाटक चार प्रकारचं असतं.

वंदना गुप्तेः अगंबाई! हो का?

पुष्कराजः येस! प्रायोगिक, प्रायोगिक व्यावसायिक, व्यावसायिक प्रायोगिक आणि व्यावसायिक.

वंदना गुप्तेः म्हणजे त्याला काहीच कळत नाही. नाटक दोनच प्रकारचं असतं. चांगल आणि वाईट. काय नाव या बसवणाऱ्यांचं?

पुष्कराजः त्यांना बी के म्हणतात.

वंदना गुप्तेः बी के? बंडू कानोले? तो अजूनही इंटरकॉलेजिएट करतो?

पुष्कराजः हो, त्यांचा मुलगा आमच्याच बरोबर आहे.

वंदना गुप्तेः अरे मलाही दोन बॅच सिनीअर होता रे तो. तुला खोटं वाटेल पण आमच्या काळात अफवा होती की बंडू कानोले जगाच्या निर्मीती पासून इंटरकॉलेजियेट मध्येच आहे. ॲडम इव्ह आणि बंडू कानोले असे तीनच जण होते म्हणे सुरुवातीला.

पुष्कराजः काही काय आई?

वंदना गुप्तेः अरे आंतरमहाविदयालयीन या शब्दाचा अर्थ महाविदयालयातील विदयार्थ्यांमधली स्पर्धा रे!

पुष्कराजः पण बाहेरच्यांनी केलं की प्राईज मिळत ना!

वंदना गुप्तेः पण चांगलं नाटक करायची आणि स्वतःची समज वाढवायची भूक मरते ना राजा! गेल्या दहा वर्षात या इंटरकॉलेजियेट मधून मराठी सिरीयल, सिनेमाला असंख्य नट नटया मिळाले पण व्यावसायिक आणि प्रायोगिक नाटकाला चांगले लेखक आणि दिग्दर्शक का नाही मिळाले याचाही विचार करायला नको का आपण? अरे गाईड मधून अभ्यास करुन परिक्षेत नंबर येतो पण पुस्तकातनं अभ्यास केला की आयुष्यभर लक्षात रहातो.

पुष्कराजः मी पुस्तकातनंच करायचो, तुला आठवत असेल तर!

वंदना गुप्तेः म्हणूनच सांगते. तू त्या बंडयाला प्रश्न विचारायला लाग आणि गम्मत बघ. तू कुठलाही प्रश्न विचारला ना, त्याच्याकडं तीनच उत्तर असायची. इंटरेस्टींग, विल वर्क नेक्स्ट टाईम आणि

पुष्करः लेटस सी!

वंदना गुप्तेः शाब्बास! तर मी सांगत होते रंगायन आणि अविष्कार बददल.

पुष्कराजः विकीपेडीया?

वंदना गुप्तेः नाही. मराठी प्रायोगिक रंगभूमीचं भारतीय रंगभूमीवर फार मोठं स्थान आहे. पुण्यात पीडीए, थिएटर ॲकेडमी, कलोपासक ,कोल्हापूरचं देवल क्लब, मुंबईचं रंगायन आणि अविष्कार, इथं साठ सालानंतरची मराठी प्रायोगिक रंगभूमी खऱ्या अर्थानं वाढली. कधी गच्चीवर नाटक व्हायचं कधी पार्कींगमध्ये, कधी हॅट कलेक्शन व्हायचं, कधी फुकट! प्रेक्षक मोजके असायचे पण मनसोक्त बघायचे. ही समोर खोली दिसतेय, इथे व्हायची सगळी नाटकं!

पुष्कराजः इथे?

वंदना गुप्तेः हो आणि सुंदर व्हायचं, रंगायचं नाटक. या जागेचं फार मोठ माहात्म्य आहे, आम्ही कॉलेज संपवून यायचो नाटकं पाहायला. तेव्हाचे धडपडे कलाकार त्याच धडपडीमुळे दिग्गज होताना पाहीले आम्ही. या जागेकडे अजूनही पाहीलं की असं वाटतं बाहेर गर्दी आहे, गोंगाट आहे, ट्रेनचा आवाज आहे, पण आत सगळीकडे अंधार आहे. प्रकाशाच्या एका झोतात अजूनही बेणारे बाई उभी आहे, पूर्ण शांतता आहे आणि कोर्ट चालू आहे.

---

<u>ॲक्ट ३ः</u> स्वगतः

शांतताः नेहा जोशीः प्रायोगिक रंगभूमी

रायगडाला जेव्हा जाग येतेः अमोल कोल्हेः ऐतिहासिक नाटक

ती फुलराणीः हेमांगी कवीः व्यावसायिकनाटक

एकच प्यालाः पुष्कर श्रोत्रीः सामाजिक नाटक

-----------------------------------------------------

अँकर लिंक ५ः

जीवनगौरव पुरस्कारः

वंदना गुप्तेः या संचातला शेवटचा प्रवेश सादर करण्याचं आज खास प्रयोजन आहे. हे रंगभूमीवरील अजरामर पात्र तर आहेच पण त्याहूनही महत्वाच आहे, ते ज्यानं त्यावेळी साकारलं तो अभिनेता. पाहूयात एक झलक!

-----------------------------------------------------

बॅरीस्टरः प्रसाद ओकः जीवनगौरव पुरस्कार

-----------------------------------------------------

अँकर लिंक ६ः

पुष्कराजः ज्या अभिनेत्यानं ही भूमिका, हे नाटक आणि मराठी रंगभूमीवर स्वतःचं स्थान अजरामर केलं त्या विक्रम गोखल्यांना यंदा झी मराठीचा जीवन गौरव पुरस्कार दिला जातोय.

पुष्कराजः ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले यांच्या नाटयप्रवासाची ही ध्वनिचित्रफीत!

------------------------------------------------------

**अेव्ही विक्रम गोखलेः**

------------------------------------------------------

**अँकर लिंक ७:**

पुष्कराजः गार्निअर ब्लॅक नॅचरल्स प्रस्तुत झी नाटयगौरव पुरस्कार २०१७,को पॉवर्ड बाय गुडनाईट अॅडवान्स अॅक्टीव्ह प्लस, इम्पीरिअल ब्लू आणि लक्स, स्पेशल पार्टनर स्टॉप अॅलर्जी! या सोहळयातल्या जीवनगौरव पुरस्काराचे मानकरी ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले.

वंदना गुप्तेः विक्रम गोखले यांना हा सन्मान देण्यासाठी मी आमंत्रित करते, अविष्कार संस्थेचे अरुण काकडे.

------------------------------------------------------

**अवॉर्ड सेट ५ः जीवनगौरव पुरस्कारः विक्रम गोखले**

------------------------------------------------------

## अँकर लिंक ८:

वंदना गुप्तेः माधव वाटव्यांचा एक शून्य बाजीराव, मा. दत्तारामांचा भीष्म, निळू फुलेंचा सखाराम, डॉ लागूंचा नटसम्राट, डॉ. घाणेकरांचा गारंबीचा बापू, विजयबाईंची नानी, मोहन आगाशेंचा नाना फडणवीस, तोरडमलांचा प्रो. बारटक्के, पणशीकरांचा लखोबा, नाना पाटेकरचा गुलाबराव, ही आणि अशी असंख्य नटमंडळी आणि त्यांच्या अविस्मरणीय भूमिका!

पुष्कराजः आय नो! टोरंटवर बघतो आहेत का हे?

वंदना गुप्तेः कशावर?

पुष्कराजः लॅपटॉपवर बघता येईल ना डाऊनलोड करुन!

वंदना गुप्तेः सहाव्या मजल्यावर खाली टाकीन आधी त्या लॅपटॉपला आणि मग तो धरायला तुला.

पुष्कराजः सॉरी! थोडक्यात एवढी अजरामर कॅरेक्टर्स झालीयेत आपल्याइथे? कमाल आहे या नटांची!

वंदना गुप्तेः नटांची आहे पण त्या आधी कमाल आहे लेखकांची. नाटककारांची. खाडिलकर देवल मास्तरांपासून आत्तापर्यंत अजरामर व्यक्तीरेखा लिहीणाऱ्या सगळया लेखकांसाठी एकदा जोरदार टाळया होऊन जाऊ देत. त्यांनी लिहीलं नसतं, तर हे

साम्राज्य कधीच उभं राहीलं नसतं. (थांबून) या सगळया आधुनिक नाटककारांचा आदय कोण माहीतेय? शेक्सपिअर.

पुष्कराजः आय नो! त्यानी हैदर, ओमकारा, आणि मकबूल ची स्टोरी लिहीलीये. म्हणजे त्याच्या नाटकांवरनं ती ॲडाप्ट केलीये.

वंदना गुप्तेः लाज राखलीस बाबा! तर खरं तर तुला एकदा शेक्सपिअरचं घर दाखवलं पाहीजे, इंग्लंडला नेऊन!

पुष्कराजः अहो पण तो तर सिक्सीटीन्थ सेंचुरीत झाला होता ना.

वंदना गुप्तेः तीच तर गम्मत आहे बाळा, त्यांच्याकडे सोळाव्या शतकातल्या लेखकाचं घर आजही जपून ठेवलं जातं, आणि आपल्याकडे शंभर वर्षांपूर्वीच्या लेखकाचा पुतळा रात्रीत तोडला जातो. एका रंगमंदीराशेजारीच नाटककाराचा पुतळा तोडण्याची ही बहुधा जगातली एकमेव घटना असेल. असो. आता दुसऱ्या शहरातल्या थिएटरला जाऊ.

पुष्कराजः कधी?

वंदना गुप्तेः हे काय आत्ता!

पुष्कराजः असं लगेच?

वंदना गुप्तेः नाटकात असचं असतं, स्टेजवरची दोन पात्र गिरकी घेतात आणि एका सेकंदात महालाचं जंगल होतं आणि मुंबईचं पुणं,

सातारा, सोलापूर, कोल्हापूर,नागपूर काहीही. चल. आज शनिवार रात्रीचा प्रयोग आहे.

------------------------------------------------------------

**परफॉर्मन्सः**

(दोघं गिरकी घेतात. एक नट शेजारी उभा आहे.)

पुष्कराजः आई हा त्या सिरीयल मध्ये आहे ना गं? केकेएम के! कुंकवाचा करंडा मध्येच कलंडला!

वंदना गुप्तेः हो. हाच तो करंडा!

पुष्कराजः सेल्फी?

वंदना गुप्तेः विचार त्याला हवाय का?

(दोघं बाजूला जाऊन थांबतात.)

नटः (फोनवर) अरे मला आला होता फोन त्या रोल साठी, पण मी नाही म्हणालो. नाही नाही तू कर, बिनधास्त. पैसे वाजवून घे. छया. मी यूटयूबवर वगैरे काम नाही करत. (फोन ठेवतो.)

मुलगीः हाय, यु आर फॅन ऑफ अस.

नटः आँ?

मुलगीः बिग फॅन! यू!

नटः थँक यू!

मुलगीः फोटो?

नटः प्लीज.

(फोटो काढला जातो.)

मुलगीः तुमचं काम फार छान होतं!

नटः आत्ताशी इंटरवल झालाय, माझी एन्ट्री दुसऱ्या अंकात आहे.

मुलगीः नाही नाही नाटकातलं नाही सिरीयलमधलं.

नटः तुम्ही नाटक पाहायला नाही आलात?

मुलगीः नाही नाही, आम्ही ताईच्या मंगळागौरीला आलो होतं, तुम्हाला पाहीलं आणि रिक्षा थांबवली म्हणलं करंडा दिसतोय. तुम्ही लाईक बिगेस्ट सुपरस्टार आहात आमच्यासाठी!

(एवढयात दुसरी एक मुलगी येते. दिपा.)

मुलगीः ओ दीपा मॅडम! कोयरी फ्रॉम कुंकवाचा करंडा?! माय गॉड!

दीपाः हाय!

मुलगीः तुमची सिरीयल पाहतो आम्ही रोज! यु आर लाईक बिगेस्ट सुपरस्टार आहात आमच्यासाठी!

(नट झपकन तिच्याकडे पहातो.)

मुलगीः ओ, एक फोटो काढा ना!

नटः सपोर्टींग असलो म्हणून काय झालं मी पण अॅक्टर आहे.

नट चिडून आत निघून जातो. त्या दोघी सेल्फी काढतात.

पुष्कराजः हा चिडून का गेला?

वंदना गुप्तेः आपल्याकडे नटाला एकवेळ मानधन कमी चालेल पण फूटेज? आज्जीबात नाही! हसण्याचा भाग सोडा पण आज या मंचावर सहाय्यक कलाकारांचा गौरव होणार आहे. कारण हे कलाकार भूमिकेची लांबी नाही तर खोली बघतात.

पुष्कराजः कारण कितीही म्हणलं, तरी नलू शिवाय नटसम्राट नाही, गंगी शिवाय गाढवाचं लग्न लागू शकत नाही, सरांशिवाय टूरटूर ची टूर निघू शकत नाही आणि चंदूकाका शिवाय वाडा चिरेबंदी नाही. गार्निअर ब्लॅक नॅचरल्स प्रस्तुत झी नाटयगौरव पुरस्कार २०१७, को पॉवर्ड बाय गुडनाईट अॅडवान्स अॅक्टीव्ह प्लस, इम्पीरिअल ब्लू आणि लक्स, स्पेशल पार्टनर स्टॉप अॅलर्जी! या सोहळयात सादर आहेत प्रायोगिक आणि व्यावसायिक नाटकाचे सहाय्यक कलाकारांचे पुरस्कार!

----------------------------------------------------

## अवॉर्ड सेट ३: सहाय्यक कलाकार

प्रायोगिक विभाग: सहाय्यक अभिनेत्री

प्रायोगिक विभाग: सहाय्यक अभिनेता

व्यावसायिक विभाग: सहाय्यक अभिनेत्री

व्यावसायिक विभाग: सहाय्यक अभिनेता

-----------------------------------------------------------

## अँकर लिंक १०: इंटीग्रेशन १ लिंक:

पुष्कराज: काय टॅलेंटेड ॲक्टर्स आहेत ना आपल्या इथं!

वंदना गुप्ते: अरे असतं, आमच्या सारख्या काही कलाकारांना निसर्गाचं वरदान असतं. कुठलाही रोल असो, काम नॅचरल होतं!

पुष्कराज: अशाच एका नॅचरल परफॉर्मर ला देऊया या वर्षीचा विशेष पुरस्कार, गार्निअर ब्लॅक नॅचरल्स प्रस्तुत मोस्ट नॅचरल परफॉर्मन्स ऑफ द इयर अवॉर्ड! हा गौरव आहे नैसर्गिक अभिनयाचा! आणि या वर्षीचा पुरस्कार देण्यासाठी मी आमंत्रित करते **ज्ञानेश्वर तडकळ, सिनीअर मॅनेजर सेल्स, लॉरियल इंडीया प्रायवेट लिमीटेड.**

---------------------------------------------------

**अवॉर्ड: गार्निअर ब्लॅक नॅचरल परफॉर्मन्स ऑफ द इयर**

---------------------------------------------------

<u>अँकर लिंक ११:</u>

वंदना गुप्ते: चला तीन आठवडयात वेगवेगळी नाटकं पाहून झाली. आता उदया कुठले प्रयोग आहेत बघ बरं? एखादं विनोदी नाटक बघ छान.

पुष्कराज: असं इंटीमेशन देणारं ॲप पाहीजे ना एखादं? आज तुमच्या एरियात असं असं नाटक होणार आहे. त्याचा प्रकार हा आहे, कलाकार हे आहेत, मुलांना बघण्यासारखं आहे किंवा नाहीये. प्ले नीअर मी असं नाव असू शकतं. मराठी रंगभूमीवर हे पण केलं पाहीजे.

वंदना गुप्ते: अरे व्वा! रंगभूमी?

पुष्कराज: मम्मा पेक्षा आईच बरं वाटत ना.

वंदना गुप्ते: हां आणि युसलेस पेक्षा गाढवा!

पुष्कराज: आणि थिएटर पेक्षा रंगभूमी! त्यात रंग आहे भू आहे आणि मी पण आहे.

वंदना गुप्तेः अजून दोन वाक्य बोललास तर मला तू हुशार बिशार वाटायला लागशील. धमाल विनोदी नाटक बघ कुठलं आहे?

पुष्कराजः (थांबून) उदया सकाळी सकाळ सकाळ चावट नावाचं नाटक आहे.

वंदना गुप्तेः नको ते आपल्याला! दुपारी?

पुष्कराजः वात्रट दुपारचे किस्से,

वंदना गुप्तेः ते ही नको आपल्याला!

पुष्कराजः हां आणि संध्याकाळी तू बोल्ड मी क्लीन बोल्ड.

वंदना गुप्तेः काहीच नको आपल्याला!

पुष्कराजः हे विनोद म्हणजे फक्त चावटच का?

वंदना गुप्तेः नाही राजा, असा गैरसमज करुन घेऊ नकोस. विनोद म्हणजे औषध. थकलेल्या मनाला बरं वाटण्यासाठी घेतलेलं औषध. विनोदी नाटक पहाण्याचे म्हणजेच हसण्याचे मेडीकल बेनिफीटस माहीतेय का? यू डोन्ट नो? आय नो! ब्लड प्रेशर कमी होतं, स्ट्रेस हार्मोन्स कमी होतात, रोग प्रतिकारक शक्ती वाढते, ॲब्स टोन होतात...असतील तर! कॅलरीज बर्न होतात, स्मरणशक्ती वाढते. म्हणून तुझ्या आज्जीला महिन्याला एक विनोदी नाटक दाखवतेच मी. फक्त तिची कवळी काढून ठेवते आधी. एकदा पहिल्या रांगेतनं इतक्या जोरात हसली होती की कवळी उडून स्टेजवर पडली.

पुष्कराजः मग चिडली असेल ना सॉलिड?

वंदना गुप्तेः हो भयंकर इंटरवल मध्ये वडा खाता आला नाही ना!

पुष्कराजः मला बघायचंय विनोदी नाटक! डेस्परेटली!

वंदना गुप्तेः  बघूया मग! विनोद हे जर औषध मानलं तर ते लाखो लोकांना देणारा हा नामांकित डॉक्टर आहे असं म्हणायला लागेल! ज्याची प्रॅक्टीस राज्यातल्या सगळया सभागृहात गेली अनेक वर्ष जोरदार चालू आहे. असा आपला सगळयांचा लाडका, सही अभिनेता... भरत जाधव! नाटक, अर्थात तुम्हाला माहीतेय!

---------------------------------------------------

<u>अ‍ॅक्ट ४:</u> विनोदी नाटकः भरत जाधव

---------------------------------------------------

<u>अँकर लिंक १२:</u>

पुष्कराजः गार्निअर ब्लॅक नॅचरल्स प्रस्तुत झी नाटयगौरव पुरस्कार २०१७,को पॉवर्ड बाय गुडनाईट अ‍ॅडवान्स अ‍ॅक्टीव्ह प्लस, इम्पीरिअल ब्लू आणि लक्स, स्पेशल पार्टनर स्टॉप अ‍ॅलर्जी!  या सोहळयात विनोदाच्या अशाच शिलेदारांचा गौरव करुया, पुढील विभागामध्ये

--------------------------------------------------

## अवॉर्ड सेट ४: विनोदी विभाग

व्यावसायिक नाटकः सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेता

व्यावसायिक नाटकः सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेत्री

सर्वोत्कृष्ट विनोदी नाटकः घोषित पुरस्कार

---------------------------------------------------------

## अँकर लिंक १३:

पुष्कराजः काय नाटक होतं! वॉव ! पण ते थिएटर असं का आहे? आपल्या लाईनीतल्या पाच खुर्च्या तुटलेल्या होत्या, डावीकडे कुणीतरी थुंकलेलं होतं, त्या टॉयलेट बददल तर बोलायलाच नको. आपण असं नाटक बघतो, करणाऱ्यांना तर कदाचित याहून मोठे इश्यूज असतील.

वंदना गुप्तेः समोर आहेत विचारायला पाहीजे. मुददे तयार करुन ठेवा रे, हा विचारायला येईल खाली.

पुष्कराजः ते विचारेनच. पण मला ऑडीयन्स म्हणून विचारायचंय, सपोझ माझ्याकडे तीनशे रुपये आहेत, तर मी टॉप च्या मॉल मधल्या थिएटरमध्ये, एसी मध्ये, सोफ्यावर बसून ७.१ सिस्टीमवर, एचडी फिल्म पहाणार का त्याच तीनशे रुपयात पार्कींगसाठी भांडून, तुटलेल्या खुर्च्यात बसून, प्रॉपर साऊंड नसलेल्या जागेत तुमचं

नाटक पहाणार? आणि नवीन जनरेशन नी नाटकाला यायचं असेल, तर नाटकही नवीन जनरेशनचं व्हायला नको का?

वंदना गुप्तेः उगाच म्हणलं तुला नाटकं बघायला चल. तुला बरंच कळायला लागलं!

पुष्कराजः मी फेसबुकआणि इन्स्टावरुन महिन्याभरात मित्रांकडनं फोटो मिळवलेत बघ. कुणी स्टेज चक्क चुकीचं बांधलंय, कुठे थिएटरमध्ये वरुन गळतंय, मेकअप रुम्स च्या टॉयलेटसची  अवस्था भयंकर आहे. अगं माझा मित्र नाटकाचं तिकीट काढून गेला तर ऐनवेळेला प्रयोग रदद झाला कारण एका राजकीय पक्षाचा कार्यक्रम लांबला. करणाऱ्यांना नाटक करायचंय, बघणाऱ्यांना मनापासून बघायचं, पण दोघांनाही या गोष्टींमुळे ते करता येत नसेल तर ही शेक्सपिअरच्या नाटकापेक्षा मोठी शोकांतिका आहे.

वंदना गुप्तेः बरोबर आहे. कुणीतरी म्हणलंय की नाटकाच्या थिएटरची अवस्था ही त्या रंगभूमीबददल बरंच काही सांगणारी असते. शासन, नाटक करणारे आणि नाटक बघणारे या तिघांनीही या संदर्भात उपाययोजना करावी आणि आपली नाटयगृह आणखी स्वच्छ, आधुनिक आणि साजेशी व्हायला हवीत. रंगमंदीर हे फक्त नाटक करणाऱ्यांसाठीच नाही तर बघणाऱ्या प्रेक्षकांसाठीही  मंदीर असायला हवं, याची जबाबदारी आपण प्रत्येकानं घेतली पाहीजे.

पुष्कराजः मी काय म्हणतो आज इथे एवढे सगळे दिग्गज बसलेले आहेत, विचारुयात आपण मराठी रंगभूमीसाठी ते यापुढे काय करणारेत!

पुष्कराज खाली येतो.

पुष्कराजः मराठी रंगभूमीवर काय व्हायला हवं, आणि त्यासाठी आपण काय करणार आहात?

---

**आडीयन्स इंटरअ‍ॅक्शनः**

१) दिग्दर्शकः

२) नटः

३) निर्माताः

४) अभिनेत्रीः

५) लेखकः

---

**अँकर लिंक १४ः**

पुष्कराजः आई, एक महिन्यापूर्वी तू दिलेली सगळी पुस्तकंमी वाचली.

वंदना गुप्तेः एवढयात झाला महिना?

पुष्कराजः नाटकात असंच असतं ना, एकब्लॅकआऊट झाला की झाला आठवडा!

पण मला थक्क व्हायला झालं गं. तक्रारी वगैरे एका बाजूला आहेत पण काय काम चाललंय मराठी रंगभूमीवर!

वंदना गुप्तेः यू नो?

पुष्कराजः हो! केवढी व्हरायटी आहे आपल्या नाटकांमध्ये, म्हणजे एकीकडे पुण्या मुंबईत व्यावसायिकआणि प्रायोगिक नाटक चालू आहे, तर दुसरीकडे झाडीपटटी सारखी एकआख्खीच्या आख्खी इंडस्ट्री नागपूर जवळ झोकात चालू आहे. दुबई, सिंगापूर अमेरीकेत ग्लोबल ऑडीयन्स समोर आपले प्रयोग होतात, आणि दुसरीकडे अगदी छोटया छोटया गावांमधनं नवीन नवीन मुल आपापल्या प्रॉब्लेम्सवर मात करत स्पर्धांमधनं भाग घेत यात येऊ पहातात.

वंदना गुप्तेः कोकणात दशावतार आणि खेळे होतात, पश्चिम महाराष्ट्रात तमाशा आणि लावणीचा अंगानं लोकनाटय बहरतं, राज्याबाहेर देशाबाहेर वेगवेगळी मंडळं मराठी नाटक करतात आणि राज्याबाहेरची देशाबाहेरची लोक आपल्या नाटकाच्या अभ्यासाला आपल्या इथं येऊन रहातात. एकीकडे सफाई कामगारांना घेऊन नाटक केलं जातं, दुसरीकडे मुलांसाठी उन्हाळयाची नाटयशिबीर होतात. एकीकडे अमराठी मुलं मराठी नाटकांकडे आकर्षित होतात

आणि असंख्य मराठी मुलं हिंदी आणि इंग्लीश नाटकांवर आपला ठसा उमटवून मराठी रंगभूमी किती समर्थ आहे याची साक्ष देतात. या सगळया लक्षवेधी मंडळींसाठी आणि मंडळांसाठी एकदा जोरदार टाळया !

पुष्कराजः आय हॅव अ क्वश्चन! अभिनेत्याला अभिनेता म्हणतात दिग्दर्शकाला दिग्दर्शक पण मग लेखकाला नाटककार का म्हणतात?

वंदना गुप्तेः कारण नाटकाला आकार देणारा ती पहिली व्यक्ती असते. कुणीतरी म्हणलंय, ॲन ॲक्टर विदाऊट अ प्ले राईट इज अ होल विदाऊट अ डोनट!

पुष्कराजः जॉर्ज नॅथन. मी पण त्याच वेबसाईटवर पाहीलं जिथं तू पाहीलंस!

वंदना गुप्तेः चला तर मग, सन्मान करुया या वर्षातल्या नाटकक रांचा आणि लक्षवेधी नाटयनिर्मीतींचा.

पुष्कराजः गार्निअर ब्लॅक नॅचरल्स प्रस्तुत झी नाटयगौरव पुरस्कार २०१७,को पॉवर्ड बाय गुडनाईट ॲडवान्स ॲक्टीव्ह प्लस, इम्पीरिअल ब्लू आणि लक्स, स्पेशल पार्टनर स्टॉप ॲलर्जी! या सोहळयातले पुढचे पुरस्कार, लेखन विभाग आणि लक्षवेधी नाटयनिर्मीती!

---

**अवॉर्ड सेट ६: लेख न आणि लक्षवेधी**

प्रायोगिक नाटक: सर्वोत्कृष्ट लेखक

व्यावसायिक नाटक: सर्वोत्कृष्ट लेखक

लक्षवेधी नाटक: प्रायोगिक विभाग (घोषित)

लक्षवेधी नाटक: व्यावसायिक विभाग (घोषित)

---

अँकर लिंक १५:

पुष्कराज: आई, आज कधी नव्हे ते तुझा मूड एवढा चांगला आहे तर मी तुला एका थिएटर ला घ्यून जाऊ का? मी शोधून काढलंय हे थिएटर!

वंदना गुप्ते: अगं बाई कुठे?

पुष्कराज: हे थिएटर एका जागी नाही, कुठंही भरतं. यातल्या कलाकारांना ना मेकअप रुम मिळते, ना चेंजिग रुम, ना चांगलं स्टेज ना चांगली सिस्टीम, पण तरीही हे नाटक होतं, दरवर्षी, तितक्याच जोमानं! दणक्यात!

वंदना गुप्तेः जे लोकांच्या आधारावर गेली अनेक दशकं उभं आहे असं महाराष्ट्राचं खरं वैभव अर्थात लोकनाटय. हजारोंचं पब्लिक आणि रंगत जाणारा वग, गण गवळण आणि बतावणीतले आबुराव बाबुराव!

पुष्कराजः आ हा हा! जरा दमानं, इथं आबुराव बाबुराव नाहीत, इथं आहेत कमळाबाई अन धनुबाई! आजच्या काळातला हा नमुना, पहिल्यांदाच सादर करतायत, दोन बायका  अन बतावणी ऐका!

---------------------------------------------------

**अॅक्ट ६: बतावणीः कमळाबाई धनुबाई**

---------------------------------------------------

<u>अँकर लिंक १६:</u>

पुष्कराजः अभिनयाचं साम्राज्य ज्या अभिनेत्यांनी या वर्षी उभं केलं त्यांचा सन्मान करुया! गार्निअर ब्लॅक नॅचरल्स प्रस्तुत झी नाटयगौरव पुरस्कार २०१७,को पॉवर्ड बाय गुडनाईट अॅडवान्स अॅक्टीव्ह प्लस, इम्पीरिअल ब्लू आणि लक्स, स्पेशल पार्टनर स्टॉप अॅलर्जी!  या सोहळयात आता अभिनयाचे पुरस्कार.

---------------------------------------------------

**अवॉर्ड सेट ७: अभिनय**

प्रायोगिक नाटक: सर्वोत्कृष्ट अभिनेत्री

व्यावसायिक नाटक: सर्वोत्कृष्ट अभिनेत्री

प्रायोगिक नाटक: सर्वोत्कृष्ट अभिनेता

व्यावसायिक नाटक: सर्वोत्कृष्ट अभिनेता

-----------------------------------------------------------

अँकर लिंक १७:

पुष्कराज: काय गं आई कुठे गेली होतीस?

वंदना गुप्ते: भाईदास वाल्यांची चलबिचल होत होती, मी सांगून आले, शेवटची वीस मिनिटं म्हणून. नाहीतर आपल्याला सवय आहेच, शेवटचा सीन म्हणला की नाटकात मागनं हळूहळू खिळे काढायला सुरुवात करतात. एकदा तर एका प्रयोगात पडदा पडायच्या आधीच एक जण फ्लॅट आत घेऊन गेला.

पुष्कराज: हा सेट नाही ना काढणार कुणी आपण बोलता बोलता?

वंदना गुप्ते: काय बिशाद? मंडळी पुरस्कार सोहळा आणि नाच यांचं आगळं वेगळं नातं आहे. हल्ली पुरस्कार सोहळयात अर्ध्या तासाच्या आत दोन हिंदी गाण्यांवर डान्स झाला नाही तर तो फाऊल धरतात.

पुष्कराजः श्या, मग डान्स नाहीच का?

वंदना गुप्तेः आहे ना, पण हिंदीतल्या गाण्यांवर नाही, मराठी नाटकातल्या गाण्यांवर!

पुष्कराजः मराठी नाटकातली गाणी?

वंदना गुप्तेः हो मग! साम्राज्य आपलं म्हणायचं अन शिलेदार दुसरीकडचे धरुन कशाला आणायचे?

पुष्कराजः आय नो! सादर आहे, कोलगेट मॅक्स फ्रेश ताजगीचा धमाका परफॉर्मन्स!

वंदना गुप्तेः अगंबाई, का बरं?

पुष्कराजः जसं कोलगेट मॅक्स फ्रेश वापरल्यानंतर आपण ताजेतवाने होतो तसं या परफॉर्मन्सेस नंतर सगळे रिफ्रेश होतील.

वंदना गुप्तेः अभिनय नाहीच जमला तर चांगला अँकर नक्की होशील!

पुष्कराजः हो आणि त्याला सिक्सपॅकही नाही लागणार! बघूयात कोलगेट मॅक्स फ्रेश ताजगीचा धमाका परफॉर्मन्स!

---------------------------------------------------

## अॅक्ट ७: मराठी नाटकांमधली गाणी

---------------------------------------------------

अँकर लिंक १८:

पुष्कराजः आई ऐकना, मला ना पुढे दिग्दर्शकही व्हायचंय!

वंदनाः मलाही वाटायचं बाळा, अंतराळ वीर व्हावं, सगळया गोष्टी नाही शक्य होतं. आणि तुला सांगते मराठी नाटकाचा दिग्दर्शक होण हे स्पेस मिशन चालवण्या पेक्षा अवघड आहे.

पुष्कराजः कसं?

वंदनाः तिथं माणसं ठरलेली असतात, इथं माणसं ठरेपर्यंत दिग्दर्शक ाचा जीव जातो.   दुसरं म्हणजे तिथ कोणीही, मला शनिवारी जरा लवकर सोड, आजच्या मिशनला मी दोनच्या ऐवेजी चार ला येईन! तुम्ही सुरु करा, मी आलोच, किंवा अरे तुम्ही पोचलात का मंगळावर?  हे काय कॉर्नरलाच आहे असं म्हणत नाही. तिथं इन्स्ट्रक्शन दिल्यावर मी इथनं इथं का जाऊ? माझा मोटीव्ह काय? हयाला जास्त महागाचा सूट दिलाय? ही माझ्या डोक्यात जातीये वगैरे असे प्रॉब्लेम नसतात! स्पेस मध्ये फक्त एकदा जाऊन परत

यायचं. इथं रोज प्रयोग नावाच्या स्पेसमध्ये नाटक सोडायचं आणि परत येईपर्यंत दिग्दर्शक गॅसवर! चंदूला विचार!

पुष्कराजः खरं आहे गं आई,कलाकृती उभी करणं आणि ती चालवणं, केवढं अवघड काम आहे. सन्मान करुया अशाच उत्साही, धडाडीच्या आणि गुणी दिग्दर्शकांचा!

-----------------------------------------------------

<u>अवॉर्ड सेट ८: दिग्दर्शक</u>

<u>सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक: प्रायोगिक नाटक:</u>

<u>सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक: व्यावसायिक नाटक:</u>

-----------------------------------------------------

<u>अँकर लिंक २०:</u>

वंदना गुप्तेः बरं मला एक सांग तुझी तयारी कशी चाललीये? आली ना स्पर्धा आठ दिवसांवर? सिकंदर थबकला का?

पुष्कराजः सिकंदर नाही, बी के थबकला! त्याने जी एकांकिका आणली होती ती स्क्रॅप केली आणि आमच्यातल्याच त्या नवीन मुलाला चान्स दिला. तो म्हणला का तर मी त्याला तीन गोष्टी सांगितल्या, इंटरेस्टींग, विल वर्क नेक्स्ट टाईम आणि...

वंदना गुप्तेः लेटस सी! शाब्बास! पोरगं सुधारलं!

पुष्कराजः पण मला एक सांग तू आधी नाटकात कामं करायचीस ना? मग नंतर काय झालं?

वंदना गुप्तेः नंतर? तू झालास! मग म्हणलं चांगलं काम करायला वेळ नाही पण चांगल काम बघायला वेळ काढता यायला पाहीजे. ज्या अर्थी आपलं नाटकावर प्रेम आहे, त्या अर्थी आपण चांगले प्रेक्षक नक्की होऊ शकतो. म्हणून तुला म्हणलं आधी चांगला प्रेक्षक हो! कारण मराठी नाटकाचा खरा नायक हा मराठी प्रेक्षक आहे. लक्षात ठेव, जोवर तुझ्यासारखा प्रेक्षक पाठीशी आहे तोवर नाटक असणार आहे!

पुष्कराजः अच्छा? तोवर नाटक असणार आहे?

वंदना गुप्तेः हो! जोवर पेपरात जाहीरात आहे,
जोवर तिकीटं फाडली जात आहेत,
जोवर नारळ फुलं वाहीली जात आहेत,
जोवर बोर्ड रंगवले जात आहेत,
तोवर नाटक असणार आहे...

पुष्कराजः जोवर तिसरी बेल वाजत आहे,
जोवर समोर कुणीतरी रडत हसत आहे,
जोवर सेटचे खिळे ठोकले जातायत,
जोवर पडदयाला आपसूक नमस्कार केले जातायत,

तोवर नाटक असणार आहे...

वंदना गुप्तेः जोवर मध्यंतरात वडा खाणारा आहे,
जोवर वाक्या वाक्यावर दाद देणारा आहे,
जोवर नंतर थांबून कुणी सांगणारा आहे,
जोवर एकदा पाहूनही पुन्हा पुन्हा येणारा आहे
तोवर नाटक असणार आहे...

पुष्कराजः जोवर माणसाच्या मनावर ताण आहे,
जोवर समाजाला थोडसं तरी भान आहे,
जोवर संवदेनांना बोचण्याची जाण आहे,
जोवर कलेला कौतुकाचं दान आहे,
तोवर नाटक असणार आहे!

वंदना गुप्तेः जोवर हे जग चालू आहे,
जोवर दोनच जिवंत माणसं शिल्लक आहेत,
जोवर एक करणारा आणि एक बघणारा आहे
तोवर नाटक असणार आहे!

पुष्कराजः गार्निअर ब्लॅक नॅचरल्स प्रस्तुत झी नाटयगौरव पुरस्कार २०१७,को पॉवर्ड बाय गुडनाईट ॲडवान्स ॲक्टीव्ह प्लस, इम्पीरिअल ब्लू आणि लक्स, स्पेशल पार्टनर स्टॉप ॲलर्जी! या सोहळयातले

शेवटचे पुरस्कार, या वर्षीचं सर्वोत्कृष्ट प्रायोगिक नाटक आणि सर्वोत्कृष्ट व्यावसायिक नाटक!

------------------------------------------------------------

**अवॉर्ड सेट ९: नाटक**

सर्वोत्कृष्ट प्रायोगिक नाटक:

सर्वोत्कृष्ट व्यावसायिक नाटक:

------------------------------------------------------------

पुष्कराज: कार्यक्रमाची सांगता करण्यापूर्वी छोटीशी ओळख, या कार्यक्रमाचं लेखक: क्षितिज पटवर्धन आणि दिग्दर्शक: समीर विदवांस. हा सोहळा दिमाखात पार पाडण्यासाठी सहकार्य केलेले सर्व प्रायोजक

Presenting sponsor: Garnier black naturals

Co powered by sponsors: Goodnight Advance active plus, imperial blue, LUX

Special Partner: Stop allergy

Associate Sponsor: Macho, Danone yogurt, Everest kanda Lasun Masala, Lagu bandhu Motivale, Colgate Max Fresh, Trust Index by Axis my india and vasmol black hair oil

वंदनाः विजेत्यांच अभिनंदन, सगळयांनी सावकाश घरी जा! पुन्हा भेटूया पुढच्या नाटयगौरव सोहळयात तोपर्यंत

दोघेः नमस्कार!

---------------------------------------------------------

क्षितिज पटवर्धन

३० मार्च २०१७  रात्री २ वाजून १० मिनिटे.